# इंग्रजी संभाषण कौशल्य येणे ही आज काळाची गरज; प्रा. प्रकाश लव्हटे




इंग्रजी विभागाच्या संभाषण कौशल्य या विषयावरील व्याख्यान प्रसंगी मार्गदर्शक प्रा.प्रकाश लव्हटे यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील, डॉ.बी. एन. रावण, डॉ.एस.एस.कुरलीकर, प्रा.ए.आर.महाजन, प्रा.एच.एस.शिरसट

इंग्रजी संभाषण कौशल्य येणे ही आज काळाची गरज आहे विद्यार्थ्यांना सरकारी किंवा खाजगी क्षेत्रात नोकरी हवी असेल तर इंग्रजी संभाषण येणे गरजेचे आहे खाजगी किंवा सरकारी क्षेत्रातील बहुतांश कार्यभार हा इंग्रजी मधून असल्यामुळे आपणाला ते बोलता येणे गरजेचे आहे इंग्रजी भाषा विद्यार्थ्यांनी आत्मसात करावी त्यासाठी एखादा कोर्स शक्य झाल्यास करावा इंग्रजी दररोजच्या जीवनामध्ये आणावी जसे की पेपर वाचन ,इंग्रजी बातम्या पाहणे ,पुस्तक वाचणे गरजेचे आहे इंग्रजीमध्ये संभाषण आल्यास स्पर्धा परीक्षेत देखील इंग्रजी व्याकरणावर आधारित प्रश्न असतात जिथे खऱ्या अर्थाने आपल्या ज्ञानाची कसोटी विद्यार्थ्यांना लावावी लागते तरच स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त होते असे प्रतिपादन सहाय्यक प्राध्यापक प्रकाश लव्हटे यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज माळवाडी-कोतोली येथील इंग्रजी विभागाच्या वतीने संभाषण कौशल्य या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी मार्गदर्शन करताना इंग्रजी विभागातील सहाय्यक प्राध्यापक प्रा.प्रकाश लव्हटे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील होते.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष सहसमन्वयक डॉ.एस.एस.कुरलीकर ,सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. ए. आर. महाजन होते .

कार्यक्रमास बी. ए व बी. एस्सी. व एन. सी. सी. विभागाचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन करण्यासाठी इंग्रजी विभाग प्रमुख व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ. बी. एन. रावण यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा. एच. एस. शिरसट यांनी केले तर आभार कु. श्रावणी पाटील हीने मानले.